# समाज कल्याण विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती

| १ | योजनेचे नांव:- आंतरजातीय विवाहितांना प्रोत्साहनपर अनुदान | निकष |
|---|---|---|
| १ | अस्पश्यृ निवारणाच योजनेचा एक भाग म्हणून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यसासठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना शासनातर्फे १९५८ सालापासून राबविण्यात येते. आंतरजातीय विवाहितांना प्रोत्साहन देण्याची ही योजना अनुजाती/अनुजमाती विमुक्त भटक्या जमाती व भटक्या जमातीच्या व्यक्तीपैकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती संवर्ण हिंदू लिंगायत, जैन अशा जातीतील विवाहास आंतरजातीय विवाह म्हणून संबोधण्यात येते. १ एप्रिल १९९५ पासून या आर्थिक सहाय्यात वाढ केली असून आता रु. १५०००/- इतके आर्थिक सहाय्य देण्यात येते होते. आता शासन निर्णय दिनांक १/२/२०१० पासून अनुदानात वाढ करण्यात आली असून रुपये **५०,०००/-** झाले आहे. अनुदानातून खालील प्रमाणे अनुदान दांपत्यांना वाटप करण्यात येते.<br>❖ दांपत्यांना बँकत संयुक्त खात्यावर रु. ५००००/- धनादेश अदा करण्यात येतो. | विहित नमुन्यात अर्ज संबंधितांना कार्यालयाकडून देण्यात येतो.<br>अर्जाबाबत.<br>➢ दांपत्यांच्या जातीचा दाखला<br>➢ विवाह नोंदणीचा दाखला<br>➢ रहिवाशी दाखला<br>➢ दांपत्यांचा विवाहाचा फोटो<br>➢ शाळा सोडलेचा दाखला<br>खरेदी केलेल्या वस्तुची यादी व रक्कम प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास वर नमुदकडून अदा केली जाते. जिल्हा परिषद कार्यक्रमाचे आयोजन करुन मान्यवरांच्या हस्ते दांपत्यांचा सत्कार करण्यात येतो. |
| २ | **७ टक्के वनमहसूल अनूदान** | निकष |
| | उपवनसंरक्षक सोलापूर वनविभाग सोलापूर या विभागाकडून जिल्हयातील वन महसुलाच्या ७ टक्के अनुदान समाज कल्याण विभागाकडे उपलब्ध करण्यात येते . समाज कलयाण विभागाकडून प्राप्त तरतुदीनुसार ग्रामपंचात हद्दीत दिवाबत्ती सोय रस्ता बांधणी करण्यात येत. प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून गटविकास अधिकारीमार्फत प्राप्त झाल्यानंतर आलेले सर्व प्रस्ताव विषय समितीच सभेत मंजूरीस्तव ठेवण्यात येते. मंजूर प्रस्तावाची रक्कम धनादेशाद्वारे संबंधित ग्रामपंचायतीस पाठविण्यात येते. वनमहसूल तालुकानिहाय गांवांची संख्या पुढील प्रमाणे आहे. | आवश्यक कागदपत्रे<br>➢ ग्रामपंचायतीचा ठराव<br>➢ एस्टीमेंट<br>➢ गटविकास अधिकारी यांची शिफारस |
| ३ | **अनुदानित वसतीगृह** | निकष |
| | सोलापूर जिल्यात एकूण ११२ वसतीगृहे कार्यरत आहेत. अनुजाती व विमुक्त भटक्या जमाती व इ. जमातीतील मुले शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने सदरची योजना अंमलात आणली आहे. वसतीगृहातील विद्यार्थ्यांना दरमहा ९००/- रु. प्रमाणे एका वर्षातील शैक्षणिक दिवसाचे म्हणजे १० महिन्याचे परिक्षण अनुदान देण्यात येते . त्यातील पहिला हप्ता जुलै मध्ये ६० टक्के अनुदान गत वर्षाच्या अंतिम अनुदानावर आधारीत देण्यात येते. व उर्वरीत ४० टक्के अनुदान माहे जोनेवारीमध्ये अनुदान निर्धारण केल्यानंतर देण्यात येते. | ➢ अनुदानित वसतीगृहाला प्रवेश घेणारा व बाहेरगांवचा असणे आवश्यक आहे.<br>➢ शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणे प्रवेश देणे आवश्यक आहे.<br>➢ वसतीगृहात विद्यार्थ्यांचे नियमीत उपस्थित राहणे आवश्यक. |

## आनुदानित वसतीगृहांचा तालुका निहाय आराखडा

| अ.क्र | तालुका | वसतीगृहांची संख्या | विद्यार्थी संख्या | कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकोट | १६ | ५७६ | ५७ |
| २ | बार्शी | १८ | ७२० | ६२ |
| ३ | करमाळा | ०६ | २५८ | २४ |
| ४ | माढा | ०३ | ९६ | ११ |
| ५ | माळशिरस | ०६ | ३७२ | २१ |
| ६ | मंगळवेढा | ०९ | २९४ | ३२ |
| ७ | मोहोळ | ०५ | १५० | १५ |
| ८ | उ. सोलापूर | १८ | ९६० | ६० |
| ९ | पंढरपूर | ११ | ६२८ | ४१ |
| १० | सांगोला | ०५ | २५० | १७ |
| ११ | द. सोलापूर | १५ | ५४६ | ५० |
| | एकूण | ११२ | ४८५० | ३९० |

| | ❖ योजनेचे नांव:- दलित वस्ती सुधार योजना | निकष |
|---|---|---|
| | दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ग्रामीण भागातील अनुजातीच्या वस्त्यामधून कित्येक मुलभूत सुखसोयीचा अभाव असतो. त्यामुळे त्यांना असेख्या अडचणींना व गैरसोयींना तोंड द्यावे लागते. अशा वस्त्यांमधून स्वच्छताविषयी सांयी, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा , अंतर्गत रस्ते, समाज मंदिर, गटार संरक्षक भिंत इ. आवश्यक कामे घेतली जातात.<br>प्रत्येक दलित वस्तीला शासन निर्णय ५ डिसेंबर २०११ अन्वये अनुदान मंजूर करण्यात येते. सदर लोकसंख्या प्रमाणात मंजूर केले जाते.<br>१. १० ते २५ लोकसंख्या रु. २०००००/-<br>२.२६ ते ५० लोकसंख्या रु. ५०००००/-<br>३.५१ ते १०० लोकसंख्या रु. ८०००००/-<br>४.१०१ ते १५० लोकसंख्या रु. १२०००००/-<br>५.१५१ ते ३०० लोकसंख्या रु. १५०००००/-<br>६.३०१ ते पुढे लोकसंख्या रु. २००००००/-<br>सदरचा प्रस्ताव योग्य त्या कागदपत्रासह ग्रामपंचासतीने तयार करुन गटविकास अधिकारी यांचे मार्फत जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागांकडे सादर करावा.<br>२००५ अन्वये पुढील २ वर्षासाठी फक्त पाणी पुरवठा योजना घ्याव्यात असे निर्देशन आहे. | आवश्यक कागदपत्रे<br>➢ ग्रामपंचायत ठराव<br>➢ एस्टीमेंट<br>➢ तरतूद प्राप्त झाली असून माहे अखेर लाखाचा खर्च असून पाणी पूरवठा भागांना मंजूरी दिलेली आहे. |

## ❖ अपंग कल्याण योजना

समाजातील संध, कर्णबधीर (बहिरे) अस्थिव्यंग, मनोविकलांग (मतिमंद) कुष्ठरोग मुक्त अपंगाच्या अंगी असलेल्या सुप्त शक्तीचा विकास व्हावा या करिता त्यांना प्ररना प्रोत्साहन देवून समाजामध्ये सर्वत्र सन्मानाने जगता यावे या करीता अपंग व्यक्ती (समाज संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ हा कायदा शासन राबवित आहे. अपंगाना सक्षम बनवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात संम्मिलित करणे हा उद्देश आहे.

समाज कल्याण विभागामार्फत पुढील योजना राबविल्या जातात.

**१) अपंग शिष्यवृत्ती:-**

**अ) अपंग विद्यार्थ्यांना शालांतपूर्व शिष्यवृत्ती :-** इ. १ ली ते १० वी या वर्गात शिकणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाची शालांत पूर्व शिष्यवृत्तीची योजना कार्यरत आहे.

**ब) अपंग विद्यार्थ्यांना मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती :-** इ. ११ वी पासून पुढील उच्च शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना

महाराष्ट्र शासनाची शालांत पूर्व शिष्यवृत्तीची योजना कार्यरत आहे.

उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी अपंग विद्यार्थ्यांनी संबंधित शिक्षण संस्थे मार्फत विहित नमुन्यातील अर्ज संबंधित गटविकास अधिकारी यांचे कडे सादर करावा. अर्जा सांबत वैद्यकिय प्रमाणपत्र , गतवर्षीचा गुण पत्रीका जोडणे आवश्यक आहे.

**२) कृत्रीम अवयव :-** अपंगांना कृत्रीम अवयव देण्याची योजना आहे. कृत्रीम अवयव या सदराखाली पुढील योजनाचा समावेश आहे.

**अ) अंध विद्यार्थ्यांना टेप रेकॉर्ड पुरविणे :-** इ. १० वी च्या पुढील शिक्षण घेणाऱ्या अंध विद्यार्थ्यांना टेप रेकॉर्ड व १० कोऱ्या कॅसेट्स पुरविल्या जातात.

**बं) वैयक्तिक श्रवण यंत्र :-** व ते ५० वयोगटातील कर्णबधीरांना त्यांच्या श्रवणऱ्हासाच्या श्रवणालेख पाहून वैयक्तिक श्रवण यंत्रे पुरविली जातात.

**क) तिन चाकी सायकल :-** ज्यांचे दोन्ही पाय अधु झालेले आहेत अशा अपंगानां तिन चाकी सायकल दिली जातात.

**३) प्रशिक्षित अपंगाना वित्तीय सहाय्य योजना :-** शासन मान्य व्यवसाय प्रशिक्षण संस्थेमधून व्यवसायाचे प्रशिक्षण घेतलेल्या अपंगाना साहित्य, साधने हत्यारे खरेदी करण्यासाठी रु. १०००/- इतकी वित्तिय अनुदान एक वेळ फक्त दिले जाते.

**४) लघुदद्योगासाठी शारिरिकदृष्टया अपंग व्यक्तींना वित्तीय सहाय्य (बीज भांडवल योजना)** अपंग व्यक्तींना स्वत:चा उद्योग सुरु करुन स्वयंरोजगाराच्या मध्यमातून आर्थिक पुनवर्सन साधता यावे म्हणून रु. १,५०,०००/- पर्यंतच्या प्रकल्पास अनूदान देण्याची योजना आहे. सदरील योजनेद्वारे प्रकल्पाच्या ८० टक्के रक्कम बँक कर्ज आणि २० टक्के रक्कम समाज कल्याण विभागाकडून बीज भांडवल म्हणून अनुदान देण्यात येते. यासाठी रितसर अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**५) गुणवंत विद्यार्थी पुरस्कार :-** विभागीय परिक्षा मार्फत घेण्यात येणाऱ्या इ. १० वी व १२ वी परिक्षेमधील गुणवत्ते नुसार प्रथम तिन क्रमाने उतीर्ण होणाऱ्या अंध, कर्णबधीर , व अस्थीविकलांग विद्यार्थ्यांना सामारंभपुर्वक रु. १०००/- रोख पारितोषीक देवून गौरविले जाते.

**६) अपंग कल्याण पुरस्कार योजना :-** उत्कृष्ट कार्य करणारे अपंग कर्मचारी, स्वयंउद्योजक, अपंगांचे नियुक्त व सेवा योजना अधिकारी यांना राज्य पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते.

**७) अपंगाना ओळखपत्र:-** अपंग व्यक्तींना ओळखपत्र देण्याची योजना कार्यन्वीत आहे. या साठी अपंग व्यक्तीनी त्रीसदस्यीय समितीच्या वैद्यकिय दाखलासह अर्ज करणे आवश्यक आहे. त्यासोबत रेशनकार्ड झेरॉक्स, रहिवासी दाखला, तीन फोटो

**८) स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंग शाळांना सहाय्यक अनुदान :-**

सोलापूर जिल्हयात मुक बधिर , मतिमंद, अंध व अस्थिव्यंग, मान्यता प्राप्त ५२ अनुदानित शाळा कार्यरत आहेत. सदर शाळा स्वयंसेवी संस्थामार्फत कार्यान्वीत आहे. अपंग लाभार्थ्यांना मोफत गणवेश, शिक्षण व परिपोषण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. जिल्हयात एकूण २७६० अपंग लाभार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. व ६५६ कर्मचारी कार्यरत आहेत. समाज कल्याण विभागाकडून प्रत्येक विद्यार्थ्यांना दर महा रु. ९००/- प्रमाणे परिपोषण अनुदान दिले जाते. इमारत खर्च दोन्ही पैकी जी रक्कम कमी असेल ती अनुज्ञेय आहे. मान्यता प्राप्त अपंग शाळेतील कर्मचाऱ्यांना दरमहा शासनाने विहित केलेल्या वेतनश्रेणी प्रमाणे १०० टक्के वेतन व भत्ते अदा केले जातात.

| अ.क्र | प्रवर्ग | अनुदानीत नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त शाळांची संख्या | विना अनुदानीत नोदणी प्रमाणपत्र प्राप्त शाळांची संख्या | एकुण शाळांची संख्या | एकूण लाभार्थी संख्या | कर्मचारी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंध | ०४ | - | ०४ | १७० | ५७ | |
| २ | अस्थिव्यंग | १० | ०२ | १० | ३८० | ७७ | |
| ३ | मतिमंद | १६ | ०६ | २२ | ८७५ | १९९ | |
| ४ | मूकबधीर | २२ | ०७ | २७ | १३३५ | ३२३ | |
| | **एकूण** | **५२** | **१५** | **६७** | **२७६०** | **६५६** | |

सदर योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग मंत्रालय मुंबई, आयुक्त अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे मार्फत राबविले जातात. जिल्हा पातळीवर समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद अंतर्गत कार्यान्वीत आहे.

## सर्वसाधारण वृध्दाश्रम :-

स्वयंसेवी संस्थेमार्फत सर्वसाधारण वृध्दाश्रम चालविण्यसाठी मान्यता देण्यात आली आहे. प्रत्येक वृध्दाश्रमाची २५ व १०० मान्य संख्या असून संस्थेस समाज कल्याण विभागाच्या दरमहा रु. ६०००/- प्रतिवृध्द १२ महिण्यासाठी परीक्षण अनुदान प्रत्येक उपस्थितीच्या सरासरीवर अदा करण्यात येते. सोलापूर जिल्हयामध्ये राकृष्ण हरी वृध्दाश्रम संतपेठ , पंढरपूर हा एकमेव वृध्दाश्रम आहे.

## मातोश्री व.ध्दाश्रम योजना :-

मातोश्री व.ध्दाश्रम योजना शासन निर्णय दि ७ नोव्हे. १९९५ अन्वये मंजूर केलेली आहे. शासनाकडून मातोश्री व.ध्दाश्रम योजनेचा आढावा घेण्यात आल्यांनंतर राज्यातील सर्व मातोश्री व.ध्दाश्रम खजगी स्वयंसेवाी संस्थाना सन २००२ व २००३ पासून कायम स्वरुप विना अनुदान तत्वावर चालविवण्यसाठी देण्याचा निर्णय क्र. ओएस/२००१/प्रक्र२४४/सुधार दि. ३ डिसेंबर २००१ अन्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार सोलापूर जिल्हयातील मातोश्री व.ध्दाश्रम, गोपाळपूर (पंढरपूर) येथे आहे.

## वृध्द साहित्यीक व वृध्दकलाकारांना मानधन योजना :-

महाराष्ट्रतील वृध्द साहित्यिक व वृध्द कालाकारांना त्यांच्या वृध्दापकाळाचे मदत म्हणून मानधन दिले जाते . सदरची योजना सांस्कृतिक कार्य संचालनालया मार्फत राबविली जाते. शा.नि. पर्यटन व सांस्कृतिक विभाग क्र. वृकमा/२००८/प्र.क्र. ३२४/सां.का. ३ दि. २३ जुलै २००९ अन्वये मानधनामध्ये सुधारणा होउून दर महा.अश्रेणी रु. १४००/- बश्रेणी रु. १२००/- कश्रेणी रु. १०००/- या प्रमाणे मानधन दिले जाते.

अटी:-

१. वय ५० पेक्षा जास्त असावे
२. वार्षीक उत्पन्न रु. २४०००/-पेक्षा कमी असावे
३. साहित्यिक व कलाकाराच्या कलाजिवना विषयी व अनुभव विषयी मान्वसर संस्थेचे प्रमाण पत्र असावे. लाभार्थ्याने आपले अर्ज त्यांचे तालुक्याच्या गट विकास अधिकारी यांचे कार्यालयाकडे सादर करावेत. व याबाबत गट विकास अधिकारी कार्यालयाकडे संपर्क साधावा. लाभार्थीची निवड वृध्द साहित्यीक व वृध्द कालाकार जिल्हा स्तरीय निवड समिती सोलापूर जिल्हा यांचे मार्फत होते. सोलापूर जिल्हयात एकूण ७९४ लाभार्थी आहेत. त्यांना मानधन मिळते आहे.

## अनुसूचित जातीच्या मुला/मुलींसाठी आश्रम

महारष्ट्र शासनप समाज कल्याण सांस्कृती कार्य व क्रिडा विभाग, मुंबई श.नि.व्ही.ए.एस. १०९५/प्रक्र५/मावक-६ दि. २५ जोने १९९६ अन्वये अनुसूचित जातीच्या मुला -मुलींसाठी स्वयंसेवाी संस्थामार्फत आश्रमशाळा योजना सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून सूरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोलापूर जिल्हामध्ये १) यमाईदेवी प्राथमिक आश्रमशाळा, मार्डी ता. उत्तर सोलापूर २) प्राथमिक आश्रमशाळा, ७९९ गोविंदपूर, पंढरपूर येथे कार्यरत आहे. या आश्रमशाळेमध्ये एकूण प्रत्येकी १४० मान्यसंख्या आहे. प्रवेशीत विद्यार्थ्यांना निवास वभोजनाची सोय तसेच दोन ड्रेस, अंथरुन पांघरून, शालेय साहित्य व शिक्षण मोफत पुरविल्या जातात. या साठी संस्थेस शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व प्रतिविद्यार्थी प्रतिमास रुपये ९००/- आकरा महिन्यासाठी परिपोषण अनुदान दिले जाते.

## ❖ औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन :-

शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थामधील संस्थमधील मागासवगी्रय (अनुजाती) विद्यावेतन कॉपट्मन ट्रेनिंग प्रोग्रॅमखाली ज्यांना रु. ४० दरमहा प्रमाणे विद्यावेतन मिळते त्यांना रु. २०/- इतके फरक विद्यावेतन देण्यात येत व ज्यांना कॉपट्मन ट्रनिंग प्रोग्रॅमखाली विद्यावेतन मिळत नाही. त्यांना समाज कल्याण विभागाकडून दरमहा रु. ६०/- इतके विद्यावेतन दिले जाते.

सन २०१२.१३ वर्षामध्ये सोलापूर जिल्हयातील १२ शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विदयावेतन दिले जाते.

## ❖ मागासवर्गीय ग्रहनिर्माण संस्थाना जमिन अनुदान व बांधकाम अनुदान

मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था महाराष्ट्र सहकारी कायदया नुसार नोंदणीकृत आहेत. अशांना समाज कल्याण विभागाकडून बांधकाम अनुदान व मंजूर अनुदान मंजूर केली जाते. या मध्ये बांधकाज खर्चाच्या मर्यादीत ३० टक्के अनुदान

दिले जाते. यामध्ये एकूण खर्चापैकी ५० टक्के बँक कर्ज २० टक्के स्वीयसहाय्य व ३० टक्के अनुदान या प्रमाणे बांधकाम खर्चाची मर्यादा आहे.

**पात्रतासाठी उत्पन्न व बांधकाम खर्चाची मर्यादा**

| अ.क्र. | उत्पन्न गट | उत्पन्नाची मर्यादा | बांधकाम खर्चाची मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | आर्थिक दुर्बल घटक | रु. २५०००/- पर्यंत वार्षिक | रुञ ६००००/- (अब) वर्ग |
| २ | अल्प उत्पन्न गट | रु. २५००१ ते ५००००/- वार्षिक | रु. १०००००/- (अ) वर्ग रु. ८००००/- (ब) वर्ग |
| ३ | मध्यम उत्पन्न गट | रु. ५०००१ ते ७५०००/- वार्षिक | रु. १५००००/- (अ)वर्ग<br>रु. १०००००/- (ब) वर्ग |
| ४ | **मध्यम उच्च उत्पन्न गट** | **रु. ७५००१/- ते ९५०००/- वार्षिक** | **रु. १५००००/- (अ)वर्ग<br>रु. १०००००/- (ब) वर्ग** |

शासन निर्णय क्र. बीसीएच/२००६/प्रक्र-१३८/मावक-२/मंत्रालय विधान भवण ४०००३२ दि. १ सप्टे. २००६ अन्वये या संस्थाची वित्तीय संस्था कडून कर्ज घेतले आहे. किंवा कर्ज नघेता बांधकाम पुर्ण करण्यास स्वखर्चाने तयार असतील त्यांना अनुदान मंजूर करण्यात येते. अनुदान वितरण चार हत्प्यात केले जाते. पहिला हप्ता प्रस्ताव मंजूर झाल्या नंतर १० टक्के दुसरा हप्ता घराचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर ५ टक्के तीसर हप्ता घराचे छतापर्यंत पुर्ण झाले नंतर १० टक्के चौथा हप्ता घर पुर्ण झाल्यानंतर ५ टक्के.

## २६ जून अंतराष्ट्रीय मादक पदार्थ व अवैद्य व्यापारी दिन साजरा

सदरचा दिन मादक पदार्थ सेवन विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाी समाज कल्याण विभागाच्या वतीने महाविद्यालय, माध्यमिक शाळा, व्यसनमुक्ती सामाजीक संस्था व इतर सामाजिक मंडळी यांना सहभागी करुन मादक पदार्थ विरोधी प्रचारासाठी संदेश यात्रा, चित्र प्रदर्शन, चर्चा सत्र, सन्मानीय तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन इत्यादी द्वारे कार्यक्रम साजरा केला जातो.

## ❖ व्यसनमुक्ती सप्ता साजरा करणे. (२ ते ८ ऑक्टोबर)

आंमली पदार्थ सेवन विरोधी जन जागृती होण्यसाठी राष्ट्रपीता महात्मा गांधी व कै. लालबहादूर शास्त्री यांच जयंती प्रत्यार्थ पंचायत समिती, ग्रामपंचायत झोपडपट्टी व आदीवासी विभाग, सेवाभावी संस्था, लोककलावंत, नेहरु युवा केंद्र, महिला मंडळे, राष्ट्रीय सेवा योजन केंद्र, सहकारी अनुदानीत व्यसनमुक्ती केंद्र यांच्या सहभागातून सांस्कृतीक कार्यक्रम, चित्र प्रदर्शन, रॅली, सभा, बैठका चर्चासत्रे तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन इ. प्रभावी माध्यमाद्वारे जागृती माहोमी राबवून व्यसनमुक्ती सप्ताह साजरा केला जातो.

## शिष्यवृत्ती योजना

**समाज कल्याण विभाग जि.प. सोलापूर कडील राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती**

| अक्र | योजनेचे नांव | योजनेचा उद्देश | निकष |
|---|---|---|---|
| १ | **इ.८ वी ते १० मध्ये शिकणाऱ्या अनुजातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना** | **मागासवर्गीय मुलींचे प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करणे यासाठी इ. ५ वी ते ७ वी मधील मुलींना शिष्यवृत्ती देण्याची सन ९५-९६ पासून आहे. त्याच धर्तीवर ८ वी ते १० वी मधील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी होण्यसाठी सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योनांतर्गत इ. ८ वी ते १० अनु. जातीच्या मुलींसाठी दरमहा १००/- प्रमाणे जुन ते मार्च या दहा महिन्याला प्रत्येक १०००/- या प्रमाणे उपस्थित भत्ता म्हणून अदा करण्यात येतो. शिष्यवृतीसाठी मागासर्गीय मुलींना उत्पन्नाची** | **अनुजातीतील मुलींना याचा लाभ दिला जातो.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अट राहणार नाही. व गुणांचीही अट राहणार नाही. विद्यार्थीनीची उपस्थिती नियमित असावी. या योजनेचे प्रस्ताव गटशिंक्षणाधिकारी , कॅम्प द्वारे या कार्यालयात सादर करण्यात येतात. या योजनेचे अनुदान एकाच हप्त्यात ऑनलाईन थेट मुलींच्या खात्यावर दिली जाते . | |
| २ | माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती देणे. | एक इयत्तेमधील किमान ५० टक्के गणासह वार्षिक परिक्षामध्ये मागासवर्गीयांमध्ये पहिला व दुसरा आलेल्या विद्यार्थ्यांस इ. ५ वी ते ७ वी पर्यंत ५००/- प्रती विद्यार्थी तसेच ८ वी ते १० पर्यंत १०००/- प्रती विद्यार्थी प्रमाणे गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.<br>सदर योजनेसाठी विद्यार्थी मागासवर्गीय असावा व ५० टक्के पेक्षा जास्त टक्केवारी असावी असे विद्यार्थ्यांना या कार्यालयाकडून गुणवत्ता शिष्यवृत्ती अदा केली जाते. तालुकास्तरावर कँप आयोजितकरुन प्रस्तावांना मंजूरी देण्यात येते व या योजनेचे अनुदान एकाच हप्त्यात ऑनलाईन थेट मुलीं/मुले यांच्या खात्यावर दिली जाते .. | प्रत्येक इय्यतेमधील मागावर्गीयां मधून (एससी/व्हीजेएनटी) १ला व २ च्या क्रमांकाच्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती दिली जाते. |
| ३ | शिक्षण फी परिक्षा फी प्रदान करणे. (मागासवर्गीय विद्यार्थीना) | अनु.जाती/जमाती/विजाभज/विमाप्र मुले-मुली शिक्षणापासून वंचीत राहू नयेत म्हणून त्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व मान्यताप्राप्त शिक्षण कामासाठी शालेय फी माफ व परीक्षा फीसाठी फॉर्म फी अदा करण्यात येते. तसेच एक वेळ एका वर्गात नापास असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय फी मंजूर केली जाते या योजनेसाठी शाळेने विद्यार्थ्यांची नांवे जात इ. माहिती देवून सादर केली जाते. परिक्षा फी (एसएससी) रु. २००/- प्रमाणे व शैक्षणिक फी शिक्षण विभाग यांचे कडून मान्य केलेल्या दराप्रमाणे अदा केली जाते. सन २००८-०९ पासून परिक्षा फी च्या दरात वाढ होऊन ३००/- रु. झालेली आहे. शिक्षण फी हि शाळेच्या बँक खात्यावर ऑनलाईन जमा केली जाते व परीक्षा फी ची रक्कम ऑनलाईन थेट मुलींच्या खात्यावर जमा केली जाते . | मागासवर्गीय मुला/मुलींना या योजनेचा लाभ दिला जातो. |
| ४ | इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अन.जाती विममुक्त भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलींना शिष्यवृत्ती | इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थीनींना सदर योजनेमध्ये मुलींची उपस्थिती सुधारणा होणे कामी दरमहा ६०/- प्रमाणे शिष्यवृत्ती दहा महिन्या करीता रु. ६००/- प्रती विद्यार्थीनींना दिली जाते . परंतू शासन निर्णय क्र. इबीसी २००३/प्रक्र४१७/मावक२/ दि. ३१ मार्च २००५ अन्वये देण्यात येणाऱ्या दरमहा ६०/- योजनेच्या नावत ही दिल करुन इ. ५वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे असे या योजनेला नवीन नांव दे ण्यात आले . या बाबत या कार्यालयामार्फत जिल्हयाच्या ठिकाणी कँपचे आयोजन करुन प्रस्तावाची छाननी करुन मंजूरी देण्यात येते. या योजनेचे अनुदान एकाच हप्त्यात ऑनलाईन थेट मुलींच्या खात्यावर दिली जाते . | |

## समाज कल्याण विभागाकडील २० टक्के सेस फंडातील योजना

❖ योजनेचं नांव :- **मागासर्गीय शेतकऱ्यांना विद्युत मोनोब्लॉक पंपसेट (५ एच.पी.) चे वाटप**
**ग्रामीण भागातील मागावर्गीय शेतकऱ्यांचे आर्थिक विकासाठी शेतीची सिंचन क्षमता वाटविणे.**

**अटी व शर्ती :-**

१) ग्रामीण भागातील अनुजाती,अनुजमाती,विमुक्त भटक्या जमाती या प्रवर्गातील मागासवर्गातील शेतकऱ्यांनाया या योजनेचा लाभ देता येईल.
२) लाभार्थ्याचे नावें शेतजमीनीचा ७/१२ उतारा, ८ अ, व ६ ड चा उतारा सादर करावा लागेल.
३) लाभार्थीचे नांवे किमान ६० आर व कमाल ३ हेक्टर एवढी शेत जमीन असावी.
४) लाभाथीचे जमीन उताऱ्यावर पाण्याचा स्त्रोत असल्याचे नमुद असावे.
५) लाभार्थीने साहित्य विकल्याचे, गहाण ठेवल्याचे अथवा विल्हेवाट लावल्याचे निर्दशनास आल्यास संपूर्ण रक्कम एकरकमी वसुली केली जाईल.
६) लाभार्भीचे विद्यत मोटारीसाठी विद्युतमंडळाची डिमांड नोट भरलेबाबत दाखला सादर करावा लागेल.
७) शेतकऱ्यास देण्यात आलेले साहित्य वापर करीत असल्याची स्थळ तपासणी गटविकास अधिकारी यांनी ६ महिन्याच्या आत करुन विनियोग दाखला सादर करावयाचा आहे.
८) लाभार्थ्यास ज्या प्रयोजनासाठी साहित्य मंजूर केलेले असेल त्याच कारणासाठी साहित्य वापर होईल या आशयाचे रुञ २० चे स्टॅप पेपरवर वाटपापूर्वी करारनामा करुन द्यावा लागेल.
९) साहित्याचे वाटप गटविकास अधिकारी यांचे मार्फत करण्यात येईल.
१०) लाभार्थ्याने यापुर्वी या प्रकारच्या कुठल्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसल्याची गटविकास अधिकारी यांनी खात्री करावी. तसेच जमीन धारणा किमान व कमाल नियमानूसार असलेबाबत पाण्याच्या स्त्रोत या सर्व बाबींची खात्री करुनच लाभार्थ्याची शिफारस करावी.
११) शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असलेल्या कुटूंबातील व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही
१२) लाभार्थ्याचे वार्षिक उत्पन्न रुपये ५०,०००/- पर्यंत असावे. दारिद्रय रेषेखालील कुटूंबास प्राधान्य राहील.
१३) सोबत अर्जाचा नमुना.

## योजनेचे नांव :- **अस्वच्छ व्यवसायात कामकरणाऱ्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती देणे.**

अस्वच्छ व्यवसायात असणाऱ्या लापकांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याची भारत सरकारची योजना या कार्यालयाकडून कार्यान्वीत केली जाते. यासाठी विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. योजनेचे निकष पुढे दिले आहेत.

**निकष/अटी**

१) ही योजना १ ली ते १० वीसाठी आहे. एका पालकाची जास्तीत जास्त दोन अपत्ये लाभ घेवू शकतात. उत्पनाची मर्यादा नाही. सर्व जाती/धर्माला लागू आहे.
२) विद्याथ्याचे पालक पुढीलपैकी व्यवसाय करीत असले तर शिष्यवृत्ती घेता येते. अ) कातडी सोलणे ब) कातडी कमावणे क) डोक्यावर मैला वाहूननेणे.
अर्जातील प्रमाणपत्र पूर्णपणे भरुन त्यावर सही/शिक्का घेणे आवश्यक आहे.
३) शिष्यवृत्ती वार्षिक दर पुढील प्रमाणे आहे.

| अ.वसतीगृहात न राहणारे विद्यार्थी | | ब.वसतीगृहात राहणारे विद्यार्थी (पुरावा आवश्यक) | |
|---|---|---|---|
| इयत्ता | रुपये | इयत्ता | रुपये |
| १ ली ते ५ वी | **रु. ९५०/-** | **३ री ते ८ वी** | रु. ३६००/- |
| ६ वी ते ८ वी | **रु. ११५०/-** | **९ वी ते १० वी** | ४३५०/- |
| ९ वी ते १० वी | रु. १३००/- | | |

४) पालकांनी रु. २०/- च्या स्टॅप पेपरवर अर्जात दिलेल्या नमुन्यात आणि जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अपूर्ण अर्ज मंजुरीसाठी विचारत घेतले जाणार नाहीत.

५) पात्र विद्यार्थीना मंजूर केलेली शिष्यवृतीची रक्कम मुख्याध्यापकांचे बँकेतील खात्यावर जाम रकण्यात येईल्. ती रक्कम पालकांच्या समक्ष विद्यार्थ्यास वाठप करुन पोच पावती संकलितपणे गटविकास अधिकारी यांचेकडे एक महिन्यात पाठविण्यात यावी.

६) योजनेच्या निकषानुसार पात्र असणा-या विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन योग्य त्या शिफारशीसह पाठविण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची आहे.

७) खोटी माहिती दिल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अपहार झाल्याचे सिध्द झाल्यास संबंधिताविरुध्द कारवाई केली जावू शकते.

८) अर्जाचा विहित नमुना सर्व गटशिक्षणाधिकारी यांचेकडे उपलब्ध करण्यात आला असून आवश्यकतेनुसार झेरॉक्स करुन वापरण्यात यावेत.